माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/९६/२०१८
दि.२०/०७/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.शशि शर्मा,
शॉप नं.३, जोशी निकेतन,
प्रकाश मार्केट रोड, भायंदर (प.),
जि.ठाणे ४०११०१.

...............अपिलार्थी

98 30/4/18 a75

जनमाहिती अधिकारी तथा,
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

...............प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्री.शशि शर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांचेकडे दि.०५/०५/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१. मीरा भायंदर महानगरपालिका के अंदर अगस्त २०१७ मे नव निर्वाचित नगरसेवकों द्वारा मनपा के प्रभाग क्रमांक १ से लेकर ६ तक सभी वार्ड अधिकारियों को किन किन विषयो पर पत्र व्यवहार किया गया और खिलाफ शिकायत पत्र डाले गए अथवा सुचना अधिकार **(RTI)** के तहत पत्र व्यवहार किए गए उनकी सबकी विस्तृत जानकारी सत्यप्रत कॉपी सहित।

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.३०/०६/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.१,२,३,४,५ व लिपिक, प्रभाग क्र.६ यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१३/०७/२०१८ रोजी दुपारी १२.४५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३२३/२०१८ दि.१६/०७/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.१,२,३,४,५ व लिपिक, प्रभाग क्र.६ व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- मला दि.०५/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कर जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.१,२,३,५ व ६ यांनी अपुर्ण माहिती दिलेली आहे.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना सुधारित माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: <u>निर्णय</u> :-

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.१,२,३,५ व ६ यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत अभिलेखाचा शोध घेऊन विनाशुल्क सुधारित माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.शशि शर्मा,
शॉप नं.३, जोशी निकेतन,
प्रकाश मार्केट रोड, भायंदर (प.),
जि.ठाणे ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

३) सहा.जन माहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, प्रभाग क्र.१,२,३,४,५ व ६

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.